**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः निमेश सोनु नाईक,

वयः ४० वर्षे, व्यवसायः नोकरी, सहा. दु. निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

राहणारः कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :**

०१. दि.२७.०२.२०२३ रोजी मी निरिक्षक कार्यालय, रोहा येथे कार्यरत होतो. त्यादिवशी माझे वरिष्ठ श्री. मालुसरे यांना मौजे फणसाडी येथील लक्ष्मण सहदेव गोरे हा त्याचे घराचे मागे गावठी हातभटटी दारुची विक्री करत असल्याबाबत गोपनिय माहिती मिळाली. त्यावरुन मी, श्री. मालुसरे व आमचे कार्यालयातील कर्मचारी मिळून शासकिय वाहन नोंदणी क्र. एम.एच.०१/डी.एक्स.८३२२ ने मौजे खारगाव येथे गेलो. साहेबांनी तेथुन दोन व्यक्तींना घटनेचे अनुषंगाने माहिती देवुन पंच म्हणुन हजर राहण्याची विनंती केली. त्यांनी ती मान्य केल्यामुळे आम्ही त्यांचेसह मिळालेल्या माहितीवरुन मौजे फणसाडी येथे गेलो. आम्ही वाहन रस्त्याचे बाजुला लावुन लक्ष्मण सहदेव गोरे म्हणजेच आरोपी याचे घरी छापा टाकला. त्यावेळी तो तेथे हजर होता. आम्हाला त्याचे घराचे मागे गोणीतील दोन रबरी टयुबमध्ये प्रत्येकी ४० लिटर गावठी हातभटटीची दारु मिळाली. सदरील मुददेमाल साहेबांनी ताब्यात घेवुन त्यापैकी १८० मि.लि. क्षमतेच्या दोन बॉटलमध्ये दारू सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी

सिलबंद केली. त्यांनी पंचांच्या सहयांची लेबले त्यावर लावली. त्यांनी तेथे पंचांसमक्ष पंचनामा तयार केला. आम्ही आरोपीचे नावाची खात्री केली. त्यानंतर आम्ही जप्त मुद्देमाल, नमुने व आरोपीसह कार्यालयात परत आलो. मी घटनेच्या अनुषंगाने फिर्याद दिली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येतो.

०२. दि. १२/०४/२०२३ रोजी मी सि.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेल्या बॉटलपैकी एक बॉटल पत्र नि.क्र.१८ अन्वये वरिष्ठांचे आदेशावरुन तपासणीकामी कलिना मुंबई येथील प्रयोगशाळेमध्ये जमा केली. सदर पत्रावर माझी, माझे वरिष्ठ व प्रयोगशाळेतील संबंधीत लिपीकाची सही असून शिक्के आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास यापुर्वी **नि.क्र.१८** देण्यात आले आहे. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही. अर्ज नि.क्र.२२ वरील आदेशाप्रमाणे आरोपीला आज न्यायालयात हजर राहण्यापासुन सुट देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.के. शिंदे यांचे मार्फत .**

०३. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहनाचे लॉकबुक् ठेवले जाते, पंचांची नावे, घटनास्थळावरील घराचा मालमत्ता क्रमांक, याबाबी फिर्यादीमध्ये नमुद नाही, कथीत घटनास्थळ खुली मोकळी जागा आहे, आमचे कार्यालयामध्ये प्रोहिबिशचा मुददेमाल जमा असतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला वरिष्ठांकडुन जास्तीत जास्त प्रोहिबिशन गुन्हे दाखल करण्याचे आदेश व मार्गदर्शन असते.

०४. हे म्हणणे खरे नाही की, श्री. मालुसरे यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरून आम्ही व इतर कर्मचारी व पंचांसह मोक्यावर छापा टाकला नव्हता, त्यावेळी तो तेथे हजर नव्हता, आम्हाला त्याचे घराचे मागे गोणीतील दोन रबरी टयुबमध्ये प्रत्येकी ४० लिटर गावठी हातभटटीची दारु मिळाली नव्हती, सदरील मुददेमाल साहेबांनी ताब्यात घेवुन त्यापैकी १८० मि.लि. क्षमतेच्या दोन बॉटलमध्ये दारू सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद केली नव्हती, त्यांनी पंचांच्या सहयांची लेबले त्यावर लावली नव्हती, त्यांनी तेथे पंचांसमक्ष पंचनामा तयार केला नव्हता, आम्ही आरोपीचे नावाची खात्री केली नव्हती, त्यानंतर आम्ही जप्त मुद्देमाल, नमुने व आरोपीसह कार्यालयात परत आलो नव्हतो, मी घटनेच्या अनुषंगाने फिर्याद दिली नव्हती, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर नाही, दि. १२/०४/२०२३ रोजी मी सि.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेल्या बॉटलपैकी एक बॉटल पत्र नि.क्र.१८ अन्वये वरिष्ठांचे आदेशावरुन तपासणीकामी कलिना मुंबई येथील प्रयोगशाळेमध्ये जमा केली नव्हती, सदर पत्रावर माझी, माझे वरिष्ठ व प्रयोगशाळेतील संबंधीत लिपीकाची सही असून शिक्के नाहीत, त्यातील मजकूर खरा व बरोबर नाही, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपासणी पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.02.04 14:50:48 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०४.०२.२०२५. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.